सकाळ



निपाणी : येथे सायबर सुरक्षा शिबिरात विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना सायबर वॉरिअर्स.

# निपाणी कन्या शाळेत सायबर सुरक्षा कार्यशाळा

निपाणी, ता. ७ : येथील दि फिमेल एज्युकेशन सोसायटी संचलित भागिरथीबाई शाह कन्या शाळेत सायबर सुरक्षा मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. शिबिरात सायबर वॉरियर्स म्हणून देवचंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांनी विद्यार्थिनींना इंटरनेटच्या सुरक्षित वापराबद्दल मार्गदर्शन केले.

सोशल मीडियाचा वापर करताना घ्यावयाची दक्षता, ऑनलाईन फसवणूक, पासवर्ड सुरक्षा, मोबाईलमधील विविध ॲप आणि सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचा बचाव कसा करावा, याविषयी वॉरिअर्सनी माहिती दिली. विद्यार्थिनींनी सायबर सुरक्षेबद्दल शंका विचारल्या. शिबिरामुळे विद्यार्थिनींमध्ये डिजिटल सुरक्षिततेबद्दल जागृती निर्माण झाली असल्याचे सांगण्यात आले. मुख्याध्यापिका डॉ. स्नेहल पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास वीरेंद्र चान्सलरकर, प्रशांत कुंभार, आर. पी. बामणे, यू. बी. नागावे, एम. एम. चिकोडे, एस. आर. ईराज, ए. डी. पाटील, ए. आर. पाटील, व्ही. ए. निगवे, एस. एस. घाटगे, आर. व्ही. मधाळे यांच्यासह विद्यार्थिनी उपस्थित होत्या. सी. एम. बाडकर यांनी आभार मानले.